**महाराष्ट्र जनशक्ती** ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हॉट्सॲप करा.


महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २१४ वा | दिनांक : १९/०६/२०२५ | वार : गुरूवार


## राज ठाकरेंशी युती केली तर फायदाच होईल : माजी नगरसेवकांचा 'मातोश्री'वरील बैठकीत सूर



**मुंबई** : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती होण्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. याबाबत दोन्ही पक्षाच्या प्रमुखांनी सध्या मौन पाळले असले तरी नेते आणि पदाधिकारी यांनी युतीची तयारी देखील सुरू केली आहे. अशातच उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील माजी नगरसेवकांची बैठक घेतली. या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या सोबत युती करावी का? याबाबत प्रश्न माजी नगरसेवकांना प्रश्न विचारला आहे.

माजी नगरसेवकांसोबत उद्धव ठाकरे यांच्या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. तसेच मनसे सोबत युती करायची की नाही? याबाबतही उद्धव ठाकरे यांनी विचारणा केली. राज ठाकरे यांच्या पक्षासोबत युती केली तर फायदाच होईल, अशी कबूली या माजी नगरसेवकांनी दिली असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पुढील काळात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतात का? याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

मुंबई महानगरपालिकेसाठी आपल्याला ज्या पक्षासोबत युती करायची आहे, त्यासाठी तुम्हाला विश्वासात घेऊनच निर्णय घेईल, असा शब्द देखील उद्धव ठाकरे यांनी सर्व माजी नगरसेवकांना दिला आहे. तुम्ही शिवसेनेसोबत राहिलात आणि निष्ठावंत आहात. त्यामुळे आगामी काळात अनेक बैठक आपल्याला घ्यायच्या आहेत. माजी नगरसेवकांनी शिवसेना भवन येथे येऊन सामान्यांचे प्रश्न सोडवण्याची मागणी देखील त्यांनी केली. शिवसेना भवन येथे निवडणूक कार्यालय उघडणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी माजी नगरसेवकांना सांगितले. राज्यात ऑक्टोबर ते नोव्हेंबर मध्ये निवडणूक लागू शकते, असा अंदाज देखील उद्धव ठाकरे यांनी बैठकीत बोलून दाखवला.

मुंबई महानगरपालिकेवर भगवा फडकवणार असा निर्धार या बैठकीमध्ये उद्धव ठाकरे यांनी माजी नगरसेवकांना बोलून दाखवला आहे. मनसे सोबत युती संदर्भात उद्धव ठाकरे यांनी आम्हाला विचारले असता त्यावर आम्ही आमचे मत मांडले असल्याचे या माजी नगरसेवकांनी सांगितले आहे. दरम्यान मनसे आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे पदाधिकारी यांनी काही आंदोलन देखील एकत्र करत आतापासून आम्ही एकत्र असल्याचे संकेत दिले आहेत.

## साहित्य अकादमीचे पुरस्कार जाहीर





साहित्य अकादमीचे २३ भारतीय भाषांमधील पुरस्कार आज जाहीर झाले. त्यात मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत आणि तरुण लेखक प्रदीप कोकरे यांना पुरस्कार जाहीर झाला. डॉ. सुरेश सावंत यांच्या आभाळमाया कवितासंग्रहाला बालवाड्.मय पुरस्कार झालाय. तर प्रदीप कोकरे यांच्या खोल खोल दुष्काळ डोळे कादंबरीला युवावाड्.मय पुरस्कार जाहीर झालाय.

नांदेडचे डॉक्टर सुरेश सावंत यांनी आजवर ४० पेक्षा अधिक पुस्तके लिहिली आहेत. प्रदीप कोकरे यांनी मुंबईच्या गिरणी कामगार संपाच्या नंतरचे जीवन, वाढती बेकारी आणि ग्रामीण भागातून नागर जीवनात येऊन स्थिर होऊ पाहणाऱ्या युवकांचे जग आपल्या कादंबरीमध्ये टिपलेले आहे.

साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली. त्यात देशभरातील २३ लेखकांना साहित्य अकादमीचे युवा पुरस्कार जाहीर करण्यात आले. डोगरी भाषेतून कोणताही पुरस्कार जाहीर करण्यात आला नाही. पुरस्कार प्राप्त लेखकांचा ताम्रपटासह ५० हजार रुपये देऊन लेखकांचा गौरव करण्यात येणार आहे.साहित्य अकादमीच्या बालसाहित्य पुरस्कारात विचारार्थ अंतिम यादीमध्ये पाच पुस्तके होती. त्यात कैलास दौंड यांचे आई मी पुस्तक होईन (कवितासंग्रह), सुरेश वांदिले यांचे आम्ही स्मार्ट मुले (कादंबरी), सुरेश सावंत यांचे आभाळमाया (कवितासंग्रह), प्रशांत असनारे यांचे मोराच्या गावाला जाऊया (कवितासंग्रह) आणि वर्षा गजेंद्रगडकर यांचा सृष्टीची निर्मिती आणि इतर कथा हा कथासंग्रह होता. यातून निवड समितीच्या सदस्यांनी बहुमताने सुरेश सावंत यांच्या आभाळमाया या कवितासंग्रहाची निवड केली. बाल पुरस्कार निवड समितीचे सदस्य म्हणून एकनाथ आव्हाड, सुषमा नवंगुल आणि लक्ष्मण कडु यांनी काम पाहिले.

## भारतीय जनता पार्टी आता पवित्र झाली : एकनाथ खडसे यांचा सुधाकर बडगुजर यांच्या प्रवेशावरून फडवणीस, महाजन यांना टोला

**जळगाव** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नाशिकचे पदाधिकारी सुधाकर बडगुजर यांच्या भाजप प्रवेशाचे तीव्र राजकीय पडसाद उमटत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते एकनाथ खडसे यांनी या प्रकरणी भाजपवर टीकेची झोड उठवत बडगुजर यांना प्रवेश देऊन भाजप आता पवित्र झाल्याचा टोला हाणला आहे.

ठाकरे गटाचे नेते सुधाकर बडगुजर यांनी मंगळवारी आपल्या समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना प्रवेश दिला. या पार्श्वभूमीवर एकनाथ खडसे यांनी भाजपवर शरसंधान साधले आहे. एकनाथ खडसे बुधवारी सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे भारतीय जनता पार्टी आता पवित्र झाली आहे. नाथाभाऊंना भाजपमध्ये प्रवेश देत असताना त्याच्यावर आक्षेप घेतला गेला. त्यांना भाजपमध्ये प्रवेश नाकारण्यात आला.

माझ्या प्रवेशामुळे भाजप त्यावेळी फार अपवित्र होत होती. पण आता या सर्वांना प्रवेश देऊन भाजप पवित्र झाली आहे, असे एकनाथ खडसे म्हणाले. खडसे यांनी यावेळी भाजपच्या कोणत्याही नेत्याचे नाव घेतले नाही. पण त्यांचा रोख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांचे विश्वासू गिरीश महाजन यांच्याकडे असल्याचा दावा केला जात आहे. फडणवीस व महाजन या दोघांनीच आपल्या भाजप प्रवेशाला विरोध केल्याचे खडसे यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

सुधाकर बडगुजर यांनी २००७ मध्ये आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. नाशिक महापालिकेत पहिल्यांदा ते अपक्ष नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यावेळी शिवसेनेचे विनायक पांडे हे अपक्ष नगरसेवकांच्या पाठिंब्यावर महापौर म्हणून निवडून आले होते. या अपक्ष नगरसेवकांत सुधाकर बडगुजर यांचाही समावेश होता. येथूनच त्यांची शिवसेनेशी जवळीक वाढत गेली.

त्यानंतर २००८ मध्ये एका जलकुंभाच्या भूमिपूजन सोहळ्यात त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्या आक्रमक शैलीमुळे पक्षाने त्यांच्याकडे २००९ ते २०१२ अशी सलग ३ वर्षे नाशिक महापालिकेच्या सभागृह नेतेपदाची सूत्रे सोपवली. २०१४ मध्ये बडगुजर यांना नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी देण्यात आली. पण त्यांचा पराभव झाला. त्यानंतर २०१९ मध्ये पुन्हा त्यांच्यावर विश्वास दाखवण्यात आला. पण त्यातही त्यांना पराभवाची धूळ चाखावी लागली. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीतही त्यांच्या पराभवाची पुनरावृत्ती झाली. त्यानंतरही ठाकरे गटाने त्यांच्या खांद्यावर नाशिकच्या जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी सोपवली. तसेच त्यांची उपनेतेपदी बढतीही केली. पण गत काही महिन्यांत त्यांची भाजपसोबतची जवळीक वाढत केली. त्यांनी नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यामुळे ते भाजपच्या दिशेने ओढल्या गेल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर मंगळवारी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करून यासंबंधीच्या चर्चांना पूर्णविराम दिला. उल्लेखनीय बाब म्हणजे बडगुजर यांच्या प्रवेशाला भाजपच्या अनेक स्थानिक नेत्यांचा विरोध होता. पण त्यानंतरही भाजपश्रेष्ठींना त्यांना पक्षात प्रवेश दिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ जून २०२५


## महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी, शाळेत शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा झाला




**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी, शाळेत शाळा प्रवेशोत्सव - २०२५उत्साहात साजरा झाला. शाळा प्रवेशोत्सवात नवागतांचे स्वागत गुलाबपुष्प, मिठाई देऊन करण्यात आले. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके आणि गणवेश वितरण मा. श्री. बाळासाहेब शिरसाठ (महानगरपालिका कार्यकारी अभियंता) आणि शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मा. श्री. कमलाकर जगताप या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## न्यू हायस्कूल व महात्मा फुले प्राथमिक शाळा, कन्नड येथे विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वाटप



**कन्नड (स्वप्नील राठोड) :** आज न्यू हायस्कूल व महात्मा फुले प्राथमिक शाळा, कन्नड येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. शाळा सुरू होताच परिसरात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. पालकांनीही या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.विद्यार्थ्यांच्या हातात नवे पुस्तकं देताना न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. विनोद पाटील सर यांनी “शिक्षण हाच खरा प्रकाश!” असे सांगत विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या वेळी महात्मा फुले प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिंपी देखील उपस्थित होत्या. त्यांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना प्रेरणादायी शुभेच्छा दिल्या.या छोटेखानी पण महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन उमेद, आत्मविश्वास आणि शिकण्याची प्रेरणा निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी न्यू हायस्कूल व महात्मा फुले प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## सिनियर राज्यस्तरीय सेपक टकारॉ निवड चाचणी

**जळगाव :** ३५ वी महाराष्ट्र राज्य सेपक टकरॉ स्पर्धा (पुरुष व महिला) नाशिक येथे २७ ते ३० जून २०२५ च्या दरम्यान आयोजित करण्यात आलेली आहे.सदर स्पर्धेत जळगाव जिल्हयाचे पुरुष व महिला दोन्ही संघ सहभागी होणार आहे. जिल्हा संघ निवड चाचणी शुक्रवारी दि. २०/०६/२०२५ संध्याकाळी ४:०० वाजता अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, प्रताप नगर, जळगाव या शाळेच्या क्रीडांगणावर ठेवण्यात आलेली आहे. ज्या खेळाडूंना सदर स्पर्धेत सहभागी व्हायचा आहे त्यांनी श्री. ईकबाल मिर्झा ९३७००००६६२, प्रा. वसीम मिर्झा ९९२३१७२९९५ व आसिफ मिर्झा ९०२१२२३४५२ यांच्याशी संपर्क करावा. सदर स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावं असे आवाहन जिल्हा संघटनेचे अध्यक्ष एजाज मलिक, प्रा. चंद्रकांत सोनवणे, डॉ. प्रदीप तळवेलकर, प्रशांत जगताप व प्रा वसीम मिर्झा यांनी केलेले आहे .निवड चाचणी साठी येणाऱ्या सर्व खेळाडूंनी आपल्या सोबत आधार कार्ड व २ पासपोर्ट फोटो घेऊन यावें.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात नॅशनल बुक ऑफ ट्रस्ट तर्फे पुस्तक प्रदर्शन




**जालना :** महाराष्ट्र पुस्तक परिक्रमा या अंतर्गत नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली यांच्यातर्फे महाविद्यालय परिसरात पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सवलतीच्या दरात विविध विषयांवर आधारित पुस्तके ज्यात विज्ञान, कला, साहित्य, राज्यशास्त्र, इतिहास, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र यासह बाल वांग्मय या विषयावर पुस्तके उपलब्ध आहेत.या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे डॉ. कल्याण कुंभार, एनबीटीचे सुरेश कुमार, सतीश कुमार, जगदीश रावत, गजराज सिंग यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपस्थित कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी संदर्भ पुस्तके खरेदी केली.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ जून २०२५


## कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालयात विद्यार्थ्यांचे उत्सवी स्वागत



**कन्नड (स्वप्नील राठोड) :** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे पारंपरिक व उत्साहपूर्ण वातावरणात जल्लोषात स्वागत करण्यात आले.शाळेचा पहिला दिवस म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी नव्या स्वप्नांची, संकल्पांची व उमेदेची सुरुवात असते. तो दिवस अविस्मरणीय ठरावा यासाठी विद्यालयात ढोल-ताशांच्या गजरात, गुलाबपुष्पांच्या वर्षावात आणि औक्षण करून आगळ्या-वेगळ्या पद्धतीने विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.शालेय गणवेशात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण करून शैक्षणिक वर्षाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. रवींद्र पाटील, पर्यवेक्षक श्री. गणेश डव्हारे, वरिष्ठ लिपिक श्री. जगन्नाथ जाधव यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या अनोख्या स्वागत सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नव्या वर्षाबाबत उत्साह, प्रेरणा व आत्मविश्वास निर्माण झाला असून, पालक आणि ग्रामस्थांकडून शाळेच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात येत.


## १२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

### शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

**DMLT**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

**PGDMLT**
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

**X-RAY**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी, १२ वी पास

**C.T.SCAN**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी, १२ वी पास

**E.C.G.**
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी, १२ वी पास

**O.T. TECHNICIAN**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी, १२ वी पास

**PG RADIOLOGY**
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

**रेडिओलॉजी**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**फिजिओथेरपी**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**ऑप्थोमेट्री**
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

**9405109103 | 8830838903**


## पालखी ज्या गावावरून पंढरपूरला जाते. त्या गावांची नावे सुद्धा अत्यंत अर्थपूर्ण आहेत.




१ } आळंदी ◈:------------
|| पालखी आळंदीतून निघते आळंदी म्हणजे
|| 'आत्मानंद' पालखीचा प्रारंभ आत्मानंदातून होतो.
२ ) पुणे ◈:------------
|| पालखी पुण्यात येते. पालखीबरोबर निघालो की
|| जन्मजन्मांतरीची पापे नष्ट होऊन 'पुण्य' प्राप्त होते.
|| { भवानी पेठ, बुरडाच्या पुलाकडील पालखी विठोबा
|| मंदिर, पुणे या ठिकाणी पालखीचा दोन दिवस मुक्काम
|| असतो. }
३ } दिवेघाट ◈:------------
|| नंतर पालखी 'संवत्सर ग्राम उर्फ सासवड' या क्षेत्राकडे
|| निघते. सासवडला जाताना दिवेघाटातून म्हणजे यम,
|| नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व
|| समाधी या अष्टांगयोगाच्या आचार 'दिव्यातून' जावे लागते.
४ } सासवड ◈:------------
|| वड म्हणजे 'सप्तचक्र' मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर,
|| अनाहत, विशुद्ध, आज्ञा व शून्यचक्र या सप्तचक्रांची
|| जागृती ही जीवनाची गरज आहे व ती जागृती
|| प्राणायामाने होते. प्राणायाम म्हणजे श्वासावर नियंत्रण,
|| श्वासावर ताबा म्हणजे 'सासवडचा' मुक्काम व परमार्थाचा
|| मार्ग सोपान होऊन 'सोपानदेवांच्या' समाधीचे दर्शन घ्यावे.
५ } जेजुरी ◈:------------
|| नंतर पालखी जेजुरीला येते. 'ज = जितेंद्र, जोरी = जास्त
|| त्रास न घेणे' म्हणजेच जो जास्त त्रास न घेता इंद्रियांना
|| जिंकतो तो आनंदी होतो.
६ } वाल्ह्या ◈:------------
|| भर दुपारी वाल्ह्यात येते. येथे दुपारचा मुक्काम असतो.
|| भर तारुण्यात माणसाने 'वाल्हे = कोमल, प्रेमळ,
|| जिव्हाळासंपन्न' झाले पाहिजे. { 'वाल्ह्यात वाल्मिकी
|| ऋषींच्या समाधीचे दर्शन होते' }
७ } लोणंद ◈:------------
|| त्यानंतर पालखी  लोणंदला मुक्कामाला येते.
|| 'लो = देणे, आनंद = परमसुख' श्रीविठ्ठल भक्तीसाठी
|| घरदार सोडून आलेला वारकरी भक्तिरसाने परमानंदी
|| होतो व तो आनंद इतरांना देतो.
८ } तरडगाव ◈:------------
|| जर तू ब्रम्हानंदाचा आनंद घेतला नाहीस तर तुला
|| जीवनात रडावे लागेल या सिध्दांताचे चिंतन करण्यासाठी
|| पालखी 'तर + रड = तरडगावला' येते.
९ } फलटण ◈:------------
|| ब्रम्हसत्यं जगन्मिथ्या । म्हणजे ब्रम्ह हे पूर्ण सत्य आहे.
|| बाकी सारे जग फोलपटासारखे मिथ्या म्हणजे टाकाऊ
|| आहे. हा अनुभव वारकऱ्यांना फलटणला आल्यावर येतो.
|| हे जीवनाचे सत्य समजल्यावर
१० } बरड ◈:------------
|| संसारातील सुखदु:खादि द्वद्वापासून मुक्त होतो.
|| त्याचे जीवनरुपी क्षेत्र वासनेचे तृणांकूर न फुटणारे 'बरड'
|| जमिनीसारखे होते.
११ } नातेपुते ◈:------------
|| नातेपुते या गावी इतर नात्याचा मोहातून मुक्त होऊन
|| तो फक्त 'श्रीविठ्ठलाचा' होतो.
१२) माळशिरस ◈:------------
|| माळ = साखळी + शिरस = ज्ञान = माळशिरस
|| पायी चालल्याने 'शारीरिक' मुखाने नामस्मरण केल्याने
|| 'वाचिक' विठ्ठलध्यासाने मानसिक तपाबरोबर कीर्तन -
|| प्रवचनाच्या 'श्रवणाने' ज्ञानाची साखळी त्याला विठ्ठलरूप
|| करते.
१३ } वेळापूर ◈:------------
|| त्यानंतर त्यांचा मुक्काम वेळापूरात होतो. क्षणभर सुद्धा
|| वेळ वाया न घालविता विठ्ठलभजन केले पाहिजे हे ज्ञान
|| होते.
१४ } वाखरी ◈:------------
|| वाखरीच्या मुक्कामी त्याची वाणी
|| 'प्रासादिक व वाचासिद्ध' होऊन.
१५ } नंतर तो पंढरपूर जाऊन 'पांडुरंगमय' होतो.

🙏 पांडुरंग...... पांडुरंग...... माऊली विठ्ठल 🙏


**(संकलन)**
**प्रा.डॉ.सुधीर पंचगल्ले**
श्री. माधवराव पाटील महाविद्यालय,मुरुम ता.उमरगा

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ जून २०२५


## अश्विनी सुभाष नेतने (खंदारे) यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** अश्विनी सुभाष नेतने (खंदारे) यांना प्राणिशास्त्र विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी पदवी प्रदान केली आहे. त्यांनी 'स्टडीज ऑन हेल्मिंथ पॅरासाईट्स फ्रॉम फ्रेश वॉटर कॅट फिशेस फ्रॉम अहमदनगर डिस्ट्रिक्ट' (Studies on Helminth Parasite from Fresh Water Catfishes from Ahmednagar District) या विषयावर आपला शोधप्रबंध मौलाना आझाद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील प्रोफेसर डॉ. जे. डी शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. त्यांनी केलेले संशोधन हे, मत्स्य व्यावसायिकांसाठी तसेच मत्स्य विषयावर संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठी फार उपयोगी आहे. डॉ. अश्विनी नेतने-खंदारे यांचे स्कोपस, यूजीसी केअर लिस्ट अँड फिशरी सायन्स रिसर्च जर्नल मध्ये ९ शोध प्रबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. डॉ. अश्विनी नेतने (खंदारे) ह्या हिंगोली पंचायत समिती सदस्य श्री. बबन नेतने आम्लेकर यांची नात असून, मुळा एज्युकेशन सोसायटीचे श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा येथील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रवींद्र खंदारे यांच्या सुविद्य पत्नी आहेत. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. मझहर फारुकी, डॉ. विजयकुमार काटेपागा, डॉ. ज्ञानेश्वर देशमुख, डॉ. विद्या प्रधान, डॉ. नेतनकर, डॉ. सय्यद सुलतान, डॉ. सुरेश काळे, डॉ. बी. एन. सोनवणे, डॉ. एम.जी.वर्पे,डॉ. सय्यद कादरी डॉ. तरन्नुम मॅडम आदिंनी अभिनंदन केले आहे.

## पुणे-सातारा रस्त्यावर अपघात : धनकवडीत रस्त्यावर उभ्या डंपरला शिवशाही बस धडकली



**पुणे :** रस्त्यात थांबलेल्या डंपरवर शिवशाही बस आदळून बसचालकासह वाहक, तसेच दोन प्रवासी जखमी झाल्याची घटना पुणे-सातारा रस्त्यावरील धनकवडी भागात घडली. डंपर रस्त्याच्या कडेला थांबवून अपघातास जबाबदार असल्याप्रकरणी डंपरचालकाविरुद्ध सहकारनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

दीपक प्रकाश माने (वय ४९, रा. गुंडेवाडी, मिरज, जि. सांगली) असे जखमी झालेल्या शिवशाही बसचालकाचे नाव आहे. याबाबत माने यांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, डंपरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मिरज ते स्वारगेट या मार्गावरील शिवशाही बस मंगळवारी (१७ जून) दुपारी एकच्या सुमारास पुणे-सातारा रस्त्यावरुन स्वारगेट स्थानकाकडे निघाली होती.

शंकरमहाराज मठासमोर डंपरचालकाने बेशिस्तपणे रस्त्याच्या कडेला डंपर थांबविला. त्या वेळी पाठीमागून शिवशाही बस डंपरवर आदळली. अपघातात शिवशाही बसचालक माने यांच्यास वाहक, दोन प्रवासी जखमी झाले. अपघातात शिवशाही बसचे नुकसान झाले.अपघाताची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल गौड यांनी घटनास्थळी जखमी झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार करण्यात आले. पोलिस हवालदार कांबळे तपास करत आहेत.

## राज ठाकरेंचा दोन भाषांचा आग्रह चुकीचा - देवेंद्र फडणवीस

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेला दोन भाषांचा आग्रह चुकीचा असल्याचे ठणकावून सांगितले. संपूर्ण देशात नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत (एनईपी) ३ भाषांचे सूत्र लागू असेल, तर महाराष्ट्र दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही, असे ते म्हणालेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या हस्ते आज बुधवारी पिंपरी चिंचवड येथील संतपीठाचे उद्घाटन झाले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी हिंदीच्या सक्तीवर राज ठाकरे यांनी घेतलेला आक्षेप जोरकसपणे फेटाळून लावला. ते म्हणाले, माझी राज ठाकरेंशी चर्चा झाली. त्यांचा आग्रह आहे की, दोनच भाषा असल्या पाहिजेत. तिसरी भाषा असू नये. मी त्यांना हे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, केंद्र सरकारने विचारपूर्वक एनईपीमध्ये तीन भाषांचे सूत्र आणले आहे. देशभरात ३ भाषांचे सूत्र असेल, तर महाराष्ट्रात दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही. एनईपी संपूर्ण देशासाठी आहे. तामिळनाडूने ३ भाषांच्या सूत्राला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले. पण कोर्टाने त्यांची याचिका फेटाळली.

ते पुढे म्हणाले, आपल्या देशातील एखादी अधिकची भाषा शिकण्यात वाईट काय आहे? आपल्या भाषेला डावलण्यात आले असेल तर वेगळी गोष्ट? पण आपली भाषा शिकत असताना आपली मुले दुसरी एखादी भाषा अजून शिकत असतील, तर त्या भाषेतील ज्ञानही त्यांच्यापर्यंत पोहोचेल. त्यामुळे राज ठाकरे यांनी केलेला दोन भाषेचा आग्रह चुकीचा आहे. एनईपी केंद्र सरकारने एकट्याने तयार केली नाही. देशभरातील तज्ज्ञांनी मिळून ती तयार केली. ती करत असताना मुलांचा मेंदू कसा विकसित होतो, आदी बाबींचा सखोल विचार करण्यात आला. हे धोरण तयार करताना ३ वर्षे चर्चा झाली. त्यावर हरकती व सूचना मागवण्यात आल्या. त्यानंतर ३ भाषेचे सूत्र स्वीकारण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, हिंदी भाषा आपण यापूर्वी अनिवार्य केली होती. पण काल काढलेल्या जीआरद्वारे ही अनिवार्यता काढून टाकण्यात आली आहे. आता आपण असे म्हटले आहे की, कुठलीही तिसरी भारतीय भाषा तुम्हाला शिकता येईल. ३ भाषेच्या सूत्राचा नवीन शैक्षणिक धोरणात समावेश करण्यात आला आहे. त्यात मातृभाषा ही अनिवार्य आहे. त्याशिवाय दोन भाषा व त्यातील एक भारतीय भाषा असावी असे हे सूत्र आहे. यापैकी एक भाषा म्हणून लोक इंग्रजीला प्राधान्य देतात. त्यानंतर कुठलीही एक भारतीय भाषा म्हणून हिंदी म्हटले होते. कारण, आपल्याकडे हिंदीचे शिक्षक मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतात. पण आता आपण ती अनिवार्यता काढून टाकली आहे. कुठलीही भारतीय भाषा तिसरी भाषा म्हणून शिकता येईल. त्यासाठी २० विद्यार्थी असले तर शिक्षक देता येईल. ऑनलाईन पद्धतीनेही ट्रेनिंग दिले जाईल.

## श्री क्षेत्र आळंदी ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा दिंडी रवाना



**दौलताबाद (जावेद अहमद) :** जव हे सकळ सिद्ध आहे, हात चालावया पाय तव तू अपुले स्वहित पाहे, तीर्थयात्रा जाय चुकू नको या उक्तीप्रमाणे श्री संत रामा जनार्दन पालखी सोहळा *श्रीक्षेत्र आळंदी ते श्रीक्षेत्र पंढरपूर संस्थापक काव्यतीर्थ आचार्य वेदांत वाचस्पती ब्रह्मलीन श्रीगुरु जगन्नाथ महाराज पवार यांनी सुरु केलेली २१ वर्षाची परंपरा कायम ठेवत दिंडी चालक ह.भ.प परमेश्वर महाराज कोरडे यांच्या नेतृत्वाखाली श्रीक्षेत्र देवगिरी दौलताबाद येथून दि १८ बुधवार रोजी आळंदी येथे रवाना झाली आहेया दिंडी मध्ये ३०० भाविक सामील झाले आहेआळंदीला हजारो भाविक सामील होऊन ही पुढे आळंदी, जेजुरी, सासवड, फलटण,बरड, माळशिरस,पुणे करत ०३ जुलै रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहचेल व दि ०७ जुलै रोजी श्रीक्षेत्र देवगिरी दौलताबाद येथे पोहचणार सांगता होणार आहे यावेळी ह.भ.प परमेश्वर महाराज कोरडे,ह.भ.प नारायण महाराज कोरडे,ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज कोरडे,ह.भ.प उध्दव म आनंदे,उपसरपंच सैय्यद मतीन,माजी सरपंच उषा कांजूणे,एन. के काकडे,योगेश पांढळे, डॉ कैलास निकम ,सदाशिव लकडे,रावसाहेब काजुने,शेख बने भा ज प संघटन महामंत्री,सुरेश चिनुके,विलास जाधव,एम डी जाधव ,शिवाजी शेरकर,रवी गुरु, ज्ञानेश्वर वरकड,गणेश वरकड व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903